# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ४५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२८/०७/२०१६.

## १) ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे एक गंभीर जखमी . :—

दिनांक २७/०७/२०१६ रोजी १६.२० वा. दर. फिर्यादी सुनिल राजाराम उरकुडे वय ४१ वर्ष, रा. शिवनी मोगरा हा सायकलने एनएच ६ रोडने स्वगावी जात असता यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन सायकल स्वारास संदीप पेट्रोल पंप मानेगाव/सडक येथे मागेहुन धडक दिल्याने जखमी करण्यास कारणीभुत झाला व अपघाताची सुचना न देता पळुन गेला. असे जखमी फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १३४(२)मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहे.

## २) लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर यांची कारवाई . :—

दिनांक २६/०७/२०१६ रोजी २०.०५ वा. दर. यातील आरोपी क्र. १ खाजगी इसम स्व:मताच्या लोकसेवकावर असलेल्या वैयक्तीक सबंधाचा वापर करुन व प्रभाव पाडुन तक्रारी रोशन विठ्ठलराव चावके वय २८ वर्ष, रा. दिघोरी/नागपुर यांना त्याचे ट्रक मध्ये रॉयल्टी पेक्षा अतिरीक्त रेती भरुन असलेल्या ट्रक विरोधात कोणतीही कायदेशिर कार्यवाही न करता ट्रक सोडण्यासाठी तक्रारी यास २,५००/—रु. लाचेची मागणी करुन २,०००/—रु. लाच रक्कम स्विकारली तसेच आरोपी क्र.२ते ४ यांनी खाजगी इसम आरोपी क्र.१ यास तक्रारी यांचे कडुन लाच घेण्यासाठी मदत केली व प्रोत्साहन देवुन अपप्रेरणा दिल्याने सरतर्फे फिर्यादी पो.नी. मनोज गभणे एसीबी नागपुर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ८,१० ला. प्र. का. १९८८ अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गभणे एसीबी नागपुर हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

## ३) अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई . :—

दिनांक २५/०७/०१६ रोजी १३.०० वा. दर. महाराष्ट्र शासन अधीसुचना /५४८/१६/०६ दि. १५/०६/२०१६ चे अधिसुचने व्दारे प्रतीबंध घातलेला व अपायकारक सुगंधित तंबाखु मालदार ब्रांड प्रत्येकी ५०० ग्राम चे १५ पॅकेट, गोल्ड ब्रांड सुपारी प्रत्येकी १०५ ग्रॅम वजनाचे २५ पाकीट, सुगंधीत तंबाखु इगल ब्रांड ४० ग्रॅम वजनाचे ७० पॅकेट, सुगंधीत तंबाखु मजा ब्रांड प्रत्येकी २०० ग्रॅम वजनाचे ३२ डब्बे असा एकुण कि. २१,७४०/—रु. असा अन्नपदार्थाचा साठा आरोपी अमर किराना स्टोअर्स च्या मालकाने विक्री साठी आपल्या दुकानात बाळगुण फिर्यादी यांना तपासणी दरम्यान माल मिळुन आल्याने आरोपीने अधिसुचने व्दारे जारी केलेल्या आदेशाची अहवेलना केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७८,२७३ भादंवि सहकलम ३(१)(झेड.झेड. व्ही),२६(२)(४),२८,३(१),२७(३)(ई)३०(२)(ए),५९अन्न व सुरक्षा माल कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) <u>विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यु . :–</u>

दिनांक ०८/०७/०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील मृतक कु. आरती सुरेश पटले वय १९ वर्ष, हीने उंदीर मारण्याचे विषारी औषध पिल्याने तिची प्रकृती बिघडल्याने तीला औषधोपचार करीता ग्रा. रु. मोहाडी प्रथमोपचार सा. रु. भंडारा व मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०९/०७/२०१६ चे १२.३० वा. मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र००/१६ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे. ला टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके पो.स्टे मोहाडी यांचे रिपोर्ट वरून पोलीस मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. गि–हेंपुजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

२८/८/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.